क्र.२/नसवि/महासभा/ ०६ /२०१२-२०१३
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनाक :- १० सप्टेंबर, २०१२

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०६ /२०१२-२०१३

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक १८/०९/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

१०/९/१२

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील दि.१४/०८/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे व दि.३१/०८/२०१२ रोजीच्या विशेष सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका स्थलसिमेतील ६० टन जळावू लाकूड साहित्यांचा व सांगली शहरातील चांदणी चौक श्री.नवलाई यांचे घराजवळील एक रेन्ट्रीचे झाड व श्री.कांते यांचे घरासमोरील एक काटेसावर जातीचे झाड याप्रमाणे दोन धोकादायक झाडे यांचा जागेवर जाहिर लिलाव करुन विक्री करणेकामी अंदाजे रु.९०,०००/- ते १,००,०००/- रक्कम येईल. त्यानुसार जळावू लाकडाचा व धोकादायक झाडांचा जाहिर लिलाव करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२३/०८/२०१२ चे विषयपत्र.**

५. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

६. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

१०/९/१२

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- १०४

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.१४/०८/२०१२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.७५ ते ठराव क्र.१०१ चे कार्यवृत्त सर्वानुमते कायम करणेत आले तसेच, विशेष महासभा दि.३१/०८/२०१२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१०२ ते ठराव क्र.१०३ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्तास १८ सदस्यांची हरकत नोंदवून कार्यवृत्त बहुमताने कायम करणेत आले.

सूचक :-

अनुमोदक :-

कार्यवृत्त बहूमताने मंजुर

महापौर,

कार्यालय अधीक्षक (म.स.)

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १८/०१/२०१२

महासभा क्रमांक :- ०६

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंचालक के.सुदर्शन यांचे दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.शेखर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रभारी अधिकारी.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे मिरज विभागाचे उपायुक्त श्री.नितीन कापडणीस यांनी राज्याचे वनमंत्री ना.पतंगराव कदमसो यांचेशी संपर्क साधून महापालिका क्षेत्रामध्ये वृक्षारोपणासाठी ५ हजार झाडे विनामुल्य मिळवून महापालिकेच्या अनावश्यक खर्च टाळून महापालिकेची सुमारे १५ लाखाची बचत केली आहे. उपायुक्त श्री.नितीन कापडणीस यांनी याकामी केलेला सततचा पाठपुरावा तसेच केलेल्या महापालिकेच्या आर्थिक बचतीसाठी केलेल्या विशेष प्रयत्नाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा उपायुक्त श्री.नितीन कापडणीस यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.संजय मेंढे

अनुमोदक :- मा.सलीम सत्तारमेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- 906

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

सांगली शिक्षण संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकीमध्ये सत्तारुढ गटाचे मा.नितीन खाडीलकर व जर्नादन लिमये यांचे संपूर्ण पॅनल बहुमताने निवडून आले त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.शेखर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- ९०८

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२३/०८/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका स्थलसिमेतील ६० टन जळावू लाकूड साहित्यांचा व सांगली शहरातील चांदणी चौक श्री.नवलाई यांचे घराजवळील एक रेन्ट्रीचे झाड व श्री.कांते यांचे घरासमोरील एक काटेसावर जातीचे झाड याप्रमाणे दोन धोकादायक झाडे यांचा जागेवर जाहिर लिलाव करुन विक्री करणेकामी अंदाजे रु.९०,०००/- ते १,००,०००/- रक्कम येईल. त्यानुसार जळावू लाकडाचा व धोकादायक झाडांचा जाहिर लिलाव करणेस व लिलाव नोटीस प्रसिद्धीच्या खर्चासह विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सह आयुक्त (उप्पर)

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- १०९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.२९/०८/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका स्थलसिमेतील ४ रेन्ट्री व १८ काटेसावर जातींच्या झाडांचा रहदारीस व नागरीकांना अडथळा होत असलेने सदरची झाडे काढणेबाबत नागरीकांची मागणी आहे. तसेच झाडे काढणेस वृक्ष समितीनेही मान्यता दिली आहे. सदर झाडांची अंदाजे किंमत र.रु.२,५४,४००/- मात्र आपसेट प्राईज धरुन सदर झाडांचा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे मालमत्ता विनियोग ७९ क नुसार जागेवर जाहिर लिलाव करणेस तसेच लिलाव नोटीस प्रसिद्धीच्या खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

शहर अभियंता (उद्याने)

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- ११०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१५/०९/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या स्थलसिमेतील १०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक असणाऱ्या बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविणेसाठी मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडील पत्र क्र.नपा./आर.आर./४९७ दि.१०/०९/२०१२ तसेच महाराष्ट्र शासन,अल्पसंख्यांक विकास विभाग,शासन निर्णय क्र.अविवि/२०१२/ प्र.क्र.८०/का.७/दि.२८/०६/२०१२ अन्वये रु.२०लक्ष अनुदान मंजूर करणेत आले आहे.

त्यानुसार महापालिका हद्दीतील १०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक असणाऱ्या बहुल क्षेत्रात नागरी सुविधा पुरविणेकामी शासन निर्णयानुसार अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिका हद्दीतील १०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक असणाऱ्या लोकवस्तीमध्ये कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती,पिण्याच्या पाण्याची सुविधा,विद्युत पुरवठा,सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते/पथदिवे,सार्व.स्वच्छतागृहे तसेच अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणेची कामे प्राधान्याने हाती घेणेबाबत शासनाचे निर्देश आहेत.

त्यानुसार सांगली जिल्हा अल्पसंख्यांक कल्याणकारी समिती सदस्य यांचे मागणीनुसार नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत खालील कामे प्रशासनाने प्रस्तावित केली आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजीत रक्कम रुपये
१.	सांगली येथील ईदगाह परिसर सुशोभित करणे.	१६,९८,४००/-
२.	मिरज शहरातील दर्गा मैदान परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे.	५,०१,६००/-
	एकूण :-	२०,००,०००/-

सबब, वरील प्रमाणे नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्यास अल्पसंख्यांक नागरी वसाहतीमध्ये सुसूत्रपणा येवून सदर भागाचा विकास होणार आहे. तरी उपरोक्त अल्पसंख्यांक नागरी वसाहतीमध्ये दोन कामांची अंदापत्रक रु.२०,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचे प्रशासकीय मान्यतेसाठी व शासनाकडून अनुदान प्राप्तीसाठी मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर.

शहर अभियंता

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका